म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ६४४

॥ ... प्रसन्न ॥

संगीत

# वीर त्रिविक्रम नाटकांतील

# पद्यावलि.

हें

पुस्तक

## माधवराव नारायण पाटणकर

यांनीं रचिलें

तें

मुंबईत 'गणपत कृष्णाजी' छापखान्यांत छापिलें.

...वृत्ति २ री.

किंमत ३ आणे

REFBK-0019485

॥ श्री गुरुदत्त प्रसन्न ॥

साग्र संगीत

# वीर त्रिविक्रम नाटकांतील पद्यावलि

REFBK-0019485
REFBK-0019485

## मंगलाचरण.

पद.१. ( जयजय देव हरे ) या चा०

प्रभो ब्रह्माविष्णुहरे । रमणियत्वन्नामांमृत प्राशन मन शांतवुनी करित दुरित परिहार ॥ ब्रह्मा० ॥ ध्रु० ॥ कलिमलभंजन रंजन करी मानस हें भवजलधींतुनि पार ॥ ब्रह्मा० ॥ निशिदिनिं सुंदर ध्यान तुझें सुमनोहर हरित षडरि अनिवार ॥ धृ० ॥

पद. २. ( राग यमन ताल त्रिवट )

गिरिजाकांता सुख देई सतत कलिमल निरसुनि हरुनि ने दुरित सुखकर सहवास चरण सरसिरुहिं नेउनिया झडकरी जीवन्मुक्त करी भो शिवा ॥ ध्रृ० ॥ पारतंत्र्य हें छळितें अतिशय झाली खरी आतां परमावधि स्वतंत्रता सुख देउनियां झडकरी सकल चराचर व्यापक सुरवर स्वधर्म रतकरी माधवा ॥ धृ० ॥

पद. ३. ( जयतिजय सुरसरी ) या चा०

सू. नटीः—विकट बहुही असे जगतिं नाटककला ॥ रसिक विद्वज्जना रंजनाकारिणी शांतमन करुनिया देई त्रि-

माहादेव भावे [illegible]
[illegible] कर

( ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या
२५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून पुस्तक
छापविण्याचा व रंगभूमीवर प्रयोग
करण्याचा वगैरे सर्व हक्क
कर्त्यानें आपलेकडे
ठेविले आहेत ).

भ्रांतिला ॥ धृ० ॥ रुचिर सुश्राव्य अशीं भाषणें गायनें ऐकुनी अभिनया पाहुनी कुतुहला । मानुनीं अंतरीं चतुर पात्रांस जे देति करतालयुत योग्य प्रोत्साहना । चतुर मार्मिक असे तेच प्रेक्षक खरे सुजनवृत्ति करी चित्रवत् जी कला । तीच रमणीय कृति मान्य होते जनां । नातरी क्षय असे श्रम धनाचा पहा व्यर्थ दवडूं नये रुचिरकाला ॥ धृ० ॥

साकी. ३.

सूत्रधारः–धर्म नीतिचा विजय ज्या मधें पूर्ण होउनी गेला॥ अशा कृतीनें तल्लिन करुनी टाकूं रसिक जनांला ॥ प्रीतीच्या कळसा ॥ पाहुनि करोत उल्हासा ॥ धृ० ॥

पद. ४. ( निंदिया उचट गईरे मोरी ) या ठुंबरीची चा०

नटीः–लोकीं या गुलामगिरी हे किती दुःखदाई ॥ सुजन युवयुवतिचा नाश न बघवे जगदीशारे धांवें त्रिपुरारी ॥ धृ० ॥ या महिवर वीर कुणी अवतरला नच अजुनी । नवल मज मजवाटे । लांछन आहे हें नर जातिस ॥ धृ० ॥

पद ५. अंजनीगीत.

गुलामः–देव आह्मांवरी निष्ठुर झाला ॥ ह्मणुनी छळिती शत्रु आह्मांला ॥ भूतलावरी वाली नुरला ॥ कोणी यावेळीं ॥ भूपति भारी कठोर झाला ॥ तिळभर माया न शिवे त्याला ॥ रक्षि ईश्वरा दीनदयाळा ॥ आह्मां या वेळीं ॥

पद. ६. ( रत हरिपदि ) या चा०

उपेंद्रनाथ–समर करुनि आपसांत द्रव्य लुटुनि नेती फस्त करुनि मुलुख सर्व सुजन छल करिती ॥ धृ०॥

भक्षयिं त्यां बंदिवान करुनि टाकिताती ॥ बाल तरुण वृद्ध सकल दुःख भोगिताती ॥ हाय ! हाय ! करुनि सतत देह जाळीताती ॥ चाल ॥ चहुं कडुनी दुःख शोक ॥ गांजतात सकल लोक ॥ जगदीश्वर कोप भजुनि घेइनाच शांति ॥ वीर शून्य रत्नपुरी बघुनि येइ खंती ॥ धृ० ॥

पद. ७. ( देवा यत्नकेल्या वांचुनी ) या चा०

त्रिविक्रमः-गुलामांचें करिन मोचन तरचि सार्थक जन्मुनी ॥
याच साठीं देह झिजविन सत्य कथितों निशिदिनीं ॥
प्रतिज्ञाही सत्य करुनी दाखवीन मी याजनीं ॥
नातरी हा देह अर्पुनी शांतवीन ही मेदिनी ॥ धृ ॥

पद. ८. ( जययदुपति ) या चा०

त्रिविक्रमः-मज रत्नपुरी बघ दिसत नरकपुर सत्य धर्म नच जेथ लेशभर नयनीति भूतदया गेलि लया त्या स्थलिं वास करी न जगदीश्वर ॥ धृ० ॥ अघोर पातक जिथें नांदतें। असें सदन मज एकचि दिसतें ॥ ह्मणति सर्व नर ज्यास नरेश्वर । तोचि दिसतसे मजसि निशाचर ॥ धृ०॥

९. दिंडी.

त्रिविक्रमः-गुलामांचा व्यापार जिथें चाले ॥ तिथें धर्माचें कृष्णवदन झालें ॥ सज्जनांच्या अब्रुची राख होते ॥ अशा राज्याचा गंध नको मातें ॥

पद. १०. ( प्रिय बंधु मनोहर ) या चा०

त्रिविक्रमः-बंधुच्या कृतीचा डंका ॥ दूर कीं करिल तव शंका ॥ अनितिची पेटली लंका ॥ देईल दुःख नृपरंका ॥ चाल० ॥ नच पिसें लागलें मजला ॥

हें स्पष्ट सांगतों तुजला ॥ कोपानल विझुनी गला ॥
बंधुच्या दुरित कलंका ॥ सांगण्या वाटतें शंका । धृ० ॥

पद. ११. ( सरदार दरबारका ) या चा०

त्रिविक्रमः-रति प्रियेवर बंधू भुलोनी ॥ खचितचि गेला बघ सुनीति त्यजुनी ॥ स्मराधीन नरास अब्रू नसे मुळींच । बंधूमम नचपरी । शत्रु आहे खरोखरी । स्वधर्महानी बघवे न नयनीं । पुण्यांशु रवी गेला अस्तास इथुनी ॥ धृ० ॥

पद. १२. ( अलम हे खुबि सारी पैसेकी ) या चा०

त्रिविक्रमः-राज्यनीति गेली लया ज्या ठायीं । तेथ येई परचक्र दुःखदायी ॥ सत्ताविक्त साहजीक परदेशी॥ गेल्यावरि सर्व जन पडती फशी ॥ पोटासाठीं मारामारी ॥ होते मग घरोघरीं ॥ स्वार्था साठीं आपसांत प्राण घेती खरोखरी ॥ बंधुप्रीति धर्म-नीति ॥ विलया जाई भूमीवरी ॥ निर्धनता दाही दिशा व्यापुनी आ पसरी ॥ धृ० ॥

पद. १३, ( मोरा सैंया ) या चा०

रतिप्रियाः-प्रियकरा मोहनी कोणी घातलीसे ॥ हाय देवा । मोहनी ॥ कोण्यातरी सवतीनें भारुनि टा-किलें ॥ रात्रंदिन माझ्या जिवा चैन नसे ॥ धृ० ॥ मन मोहनाची वृत्ति बघोनी । अतिशय भय मज वाटतसे ॥ प्रियकरा० ॥

पद. १४. ( परि शिवा न लावी हात मला ) या चा०

त्रिविक्रमः-ही कोण हडळ मज गांजितसे ॥ मज भीति हिची बहु वाटतसे ॥

रतिप्रियाः-प्रिय कांताला वेड लागलें ॥ सत्य असे हा भास ॥

वा. क.



त्रिविक्रमः–ही कोण हडळ मज ॥ धृ० ॥
रतिप्रियाः–नका नका हो बोलूं ऐसें ॥ दासिस होतो त्रास।
त्रिविक्रमः–तव स्पर्श मला कीं भाजितसे ॥ धृ० ॥
रतिप्रियाः–सर्वस्वी मम संशय फिटला॥पुरे आतां सहवास॥
त्रिविक्रमः–हें स्पष्ट वचन तव सत्य असे ॥ धृ० ॥

पद १५. ( सुनिये मेरी गुलकापरी ) या चा०

त्रिविक्रमः–वदनशशी बघुनी होती नयन थंडगार ॥
विधिघटनें लाभलिसे ऐशी सुंदर नार ॥
रतिप्रियाः–पुरे करा कपटस्तुति श्रम न करा फार ॥
त्रिविक्रमः–कुलवान् सुगुण खनी करि युवति अशा करिति कुलोद्धार ॥
रतिप्रियाः–नका करूं आर्जव माझें उगिच वारंवार ॥
सौख्य तुह्मां होई न खरें नकाच होऊं बेजार ॥
त्रिविक्रमः–कुलवान् सुगुण खनी ॥ धृ० ॥

पद १६. ( नच मातें कोणी स्नेही ) या चा.

रतिप्रियाः–जनिं जात स्त्रियांची भोळी ॥ भोगिति दुःख त्रिकालीं ॥ धृ० ॥ निष्ठुर नर हे आह्मांवरती ॥ विश्वासातें कधिं नच ठेविती ॥ आनंदानें नच वागविती ॥ कोणी नसे कीं वाली ॥ आह्मांला ॥ धृ० ॥ कोप धाक शासन त्रय मूर्ति ॥ शस्त्रें यांचीं अजस्त्र तरि किती ॥ अबलांना हीं थर थर भिंवविती ॥ रक्षि अह्मां वनमाळी ॥ सदोदित ॥ धृ० ॥

पद १७. ( सत्याचा विजय ) या चा०

रतिप्रियाः–जादू मंत्र कोण्या सवतीनें केला भोळ्या अशा मम प्रियकरा ॥ प्रीतिभंग मम सर्वस्वी झाला काय झालें तुह्मां मनोहरा ॥

त्रिविक्रमः–कुटिल नारिनें मज भारुनियां ॥ टाकियलें
बघ वश करुनीयां ॥ मी नच समर्थ तिज जिंकाया॥
जगदीशाची अघटित माया ॥

रतिप्रिया:–कोण ऐशी कुटिल नारी सांगा तरि मजला ॥
काढिते मी धिंड आतां विलंब मुळिं न कराच जी
कुलवैरी ॥ तिजला धाडीन कृतांत नगरीं ॥

त्रिविक्रमः–फुकट वल्गना मुळिं तूं न करी ॥ तिजला
सहाय करि शनी शौरि ॥

रतिप्रिया:–असत्य कधिं नच्च होईल वैखरी ॥ तिजला
धाडीन कृतांत नगरीं ॥ धृ० ॥

पद १८ ( मस्तक भडकुनी गेलें ) या चा०

त्रिविक्रमः–सकल जगाला व्यापुनी उरल्या कपटी नारी
या भूवरतो ॥ मदिरा प्राशन केल्यावांचुनी मनुजा
धुंदी नच येते ती ॥ युवतीस बघतां धुंदी चढते
सकलां आहे याची प्रचीति ॥ महिमा यांचा वर्णन
करितां टेकीस आला अहिवर सुमती ॥ धृ० ॥

पद १९. ( राग बेहाग ताल त्रिवट ).

मीनकेतनः–बंधु सौख्य तें तिळभर मजला लाभत नाहीं
या भूवरती ॥ या चिंतेनें अंतर्यामा कधिं न मिळतसे
कीं विश्रांती ॥ सूज्ञ बंधु मम किति तरि होता परि
त्याची ये आतां खंती ॥ चित्त तयाचें भ्रमित होउनी
गेला कामांतुन या पुढती ॥ धृ० ॥

पद. २०. ( प्रिये चारुशीले ) या चा०

मीनकेतनः–तुजसि काय झालें ॥ आज तव वदन कां
सुकुनि गेलें ॥ कोण तव छळ करी ॥ सांग मजला
तरी ॥ कोप सोडुनी दे त्वरित बाले ॥ ध्रु० ॥

उष्ण हे श्वास किति येति वदनांतुनी तप्त हें हृदय तव किति जाहलें ॥ धृ० ॥

पद. २१. ( कलिच्या किति ह्या विचित्र लीला ) या चा०

रतिप्रिया:-कथिते आभागिनीचें नशीब फुटलें ॥ सकल सुखाचें मंदिर खचलें ॥ धृ० ॥ तव बंधूला वेड लागुनी भलभलतें वदतात ॥ काय करूं तरी ॥ उगिच धांवती ॥ अशिव बोलतो ॥ व्यर्थ मारितो ॥ सोसूं छळ किती ॥ झोंप नये दिनरात । मस्तक हें फिरलें ॥ धृ० ॥

पद. २२. ( हास्य मुखा पाहुनि मज ) या चा०

मीनकेतनः-सुंदर युवतीस पहा राग किती येत असे ॥ भृकुट धनु ओढुनिया नयनशरें वेधितसे ॥ अपराधी दास तुझा तुजसि क्षमा मागतसे ॥ प्रिय सखये घे पदरीं तुजविण जग शून्य दिसे ॥ धृ० ॥

पद. २३. ( हरी तुला किती समजवुं रे ) या चा०

मीनकेतनः-प्रिय मनास या दुखवुं नको सुमती ॥ मांडिवरी दत्तक मी देईन गे तव सुदती ॥ धृ० ॥ राष्ट्राची तूं स्वामिणि होशील राज्य विभव सेवाया ॥ राज्य सारें हें तुझेंगे । घे हृदयीं । चिरकालीं । सुखशांती ॥ धृ० ॥

पद. २४. ( बनके तवंगर मिसली सिकंदर ) या चा०

त्रिविक्रमः- कमल तुंतुतें वायस भक्षण करित असे जगतीं ॥ कैसा ॥ हंस बिचारा कर्दामिं पडुनी भोगी दुःख अती ॥ कैसा ॥ उग्र केसरी हार करीला गेला भूवरती ॥ कैसा ॥ महा भुजंगा दर्दुर खाया टपला कीं जगतीं ॥ कैसा० ॥ चाल ॥ केतकि गंधा

वरती मूषक मोहित होवोनी ॥ कस्तुरि परिमल वराह घेई आनंदें विपिनीं ॥ केशर चंदन मिश्रित उटिचें लेपन लेवोनी ॥ गर्दभ अश्वा पुढतो नाचे ऐट मारोनी ॥ कलिपुढती । थकलि मती ॥ हें कालकुतूहल मनुजाला ने सत्य नरक लोकाला ॥ आजिया ॥ मदांधाला नसे अब्रू परी ह्मणवी जनीं गब्रू ॥ धृ० ॥

पद. २५. ( अपुलियाबळें ) या अभंगाची चाल.

त्रिविक्रमः-मत्तमहिषाला जुंपुनि घाण्याला । खरपुस घ्या वा समाचार ॥ लाखामध्यें एक पतिव्रता नारी ॥ इतर सर्वत्र गोलंकार ॥ स्मराधीन झाला नर जो तयाला ॥ माराव्या पैजारा खरोखर ॥ परनार वीष मानील पियुष ॥ मिळे न तयास मुक्तिद्वार ॥ जगदीशरोष होउनि अपार ॥ करिल बेजार वारंवार ॥ भवचक्रावर फिरवि गरगर ॥ नकरी उद्धार विश्वंभर ॥ ॥ धृ० ॥

पद. २६. ( ब्यांडच्या चालीवर० )

मीनकेतनः-बंधु पिसा होऊनि किति भ्रमित जाहला ॥ भलभलतें वदत असें राजकुलीं व्यर्थ निपजला॥ धृ० ॥

रतिप्रिया:-मस्तका वरति या त्वरित डाग देउनी पहा ॥ पुरे करा व्यर्थ लाड हे । कौतुक तव करिल नाश ॥ खचित भूवरी महा ॥ संशय आतां फिटला सारा ॥ बेदम मारुनि धुंदि उतरा ॥

मीनकेतनः-बंधो । अजुनी शुद्धीवर ये ॥

रतिप्रिया:-मूर्खास सुबोध करुनि उगिच कोमल मानस दुखवूं नका ॥ धृ० ॥

(अंक १ ला समाप्त.)

(१९) क्र. 229

## अंक २ रा.

पद. २७. ( राग सारंग ताल त्रिवट. )

उपेंद्रनाथः–सदानंद जगदीश्वर निर्विकल्प निरहंकार । व्यापुनी राहिला सकलही चराचर ॥ धृ० ॥ निर्विकल्प निरामय निरंजन परमोदार ॥ परमहंस परमानंद रूपतव अगोचर ॥ सदोदित हृन्मानसीं वास करी जगदोद्धार ॥ धृ० ॥

पद. २८. ( प्राचीन समयीं ज्यास्थलीं ) या चा०

त्रिविक्रमः–ज्या स्थलीं नांदती अधर्म अनीति अदया ॥ अशास्थलीं मम मानस न रमे सदया ॥ हें निंद्य राष्ट्र भासतसे दुर्गतिचा पाया ॥ कारण होइल सत्य नरकीं लोटाया ॥ मी तपोबलानें देइन शांती हृदया ॥ करा अनुग्रह मजवरती या समया ॥ हें शून्य दिसतसे सर्व जगत नयनां या झडकरि दीक्षा द्यावी मला गुरुराया ॥ धृ० ॥

पद. २९ ( जलांतरीं पियास ) या चा०

उपेंद्रनाथः–कष्टसाध्य तापस ही वृत्ति कीं असे॥कोमलता या कामीं कधिं न येतसे ॥ वैराग्यवृत्ति धरिन मनीं सूज्ञ नृपसुता ॥ सकल प्रजाहित साधी धरुनि दक्षता॥ देतो तुज आशिर्वच मुदित मानसें ॥ सद्गुरु चरणारविंद मुक्त करितसे ॥ धृ० ॥

दिंडी. ३०

उपेंद्रनाथः-ब्रह्मरंध्रीं आत्म्यास ठेउनीया ॥
सदा शांती देतसो मानसा या ॥
ऊर्ध्वरेती जे तापसी तया माया ॥
शक्य नोहे जिंकण्या बा जगीं या ॥ धृ० ॥

पद. ३१ ( पतिचें दर्शन ) या चा०

चारुलता:-माझें दुःख तुला न दिसे ॥ भो मदनारी अजुन कसें ॥ सर्वसाक्षि तुज ह्मणति असे ॥ मीच तुला मग कां न दिसें ॥ मज्जन्माचें करिन हंसें ॥ हीच विनंती तुजसि असे ॥ चाल ॥ भव भय हरणा । दीनोद्धरणा । पतित पावना । गिरिजा रमणा ॥ दुरित नाशना ॥ चिरसुखसदना ॥ दे शांति मना ॥ भावी स्थिति मनीं सतत वसे ॥ ह्मणुनी तिळभर शांति नसे ॥ धृ० ॥

पद. ३२ ( या मंत्र सिद्धिचा ) या चा०

चारुलता:-या जगतिं कुंटिणी जिवंत जखिणी असती ॥ जखिणी न हाल बहु करुनी जीवहा एकदम घेती ॥ याहूनि कुंटीणिची निंद्य रीति ॥ या उघडपणानें खून अब्रुचा करिती ॥ अब्रुचें मोल नच होतें ॥ कधिं कुणा क्वचित या सुजनीं ॥ अब्रु असेही खरा आत्मशांती ॥ धृ० ॥

पद. ३३ ( तनये नको अशी ) या चा०

कुंटीण—रसना तुझी पहा ॥ चिरून टाकुनी ॥ करीन हाल हाल मी तुझे अहर्निशीं ॥ टक्के वसूल ते करोनि घ्यावया ॥ तुकडे तुकडे करीन सत्वरी ॥ धृ० ॥

पद. ३४ ( अतिशय बेमान ) या चा०

चारुलता:—विकत या घेउनि कोमल बाला ॥ दाउनि बनविती नाटकशाला ॥ लाविती दुर्जन दुस्संगतिला ॥ अनीति राष्ट्राची स्वामिणी ॥ बनते कुंटीण कर

घेवोनी रति मदनोत्सुक करितात गोपालकाला ॥ ॥ चाल ॥ कोमल या देहाची आहुति देईन मी ॥ तुजसम या भूवरती कोणि न बेशरमी ॥ अर्पिन देह मी कुलिन नराला ॥ राहिन वंदुनी तच्चरणाला । सद्धर्म देइल चिरसौख्याला ॥ सन्मार्ग वर्तन देइल सुखशांतीला ॥ धृ० ॥

पद. ३५. ( तुज नमन करुनि गौरीहरा ) या चा०

उपेंद्रनाथः—तवहृदय रंजन होउनिया ॥ जाईल चिंताग्नि विझुनिया ॥ सत्यवच मम मानुनिया ॥ दिलेंस भूषण या समया ॥ अभंग भूषण भूतदया ॥ शोभवी मनुजा भूवरिया ॥ आशिर्वच मम घेउनिया ॥ युवति सांत्वन करीसया ॥ धृ० ॥

पद. ३६. ( केरव्याच्या चालीवर )

चारुलताः—असुखार्णांतुनि मोचन होउनी अमृत डोहीं आज बुडालें ॥ मदन मनोहर भूपति नंदन संगति सुख मज आज लाभलें ॥ धृ० ॥ संतानुग्रह मजवरि होउनी दुःस्थितिचा कीं शेवट झाला ॥ भगवंताच्या अघटित लीलेनें जग अवघें व्यापियलें ॥ धृ० ॥

पद. ३७. ( ब्यांडच्या चालीवर )

उपेंद्रनाथः—सुखकारक ही होईल युवती तुजसी सुमते या भूवरती ॥ गुणसुंदरि ही कुलजा ललना भूषण देईल कीं बघ सुदती ॥ श्री जगदीश्वर तुज सहकारी ॥ या नव वधु सह घे सुख शांती ॥ लेश न संशय धरि तूं चित्तीं स्वीकृति करि इजसी सुमती ॥

त्रिविक्रम } संतानुग्रह मंगलकारक अक्षय शांती सुख
चारुलता } द्याया ॥ कारण झाला सांप्रतकाळीं विधि-
घटनेनें या जगतीं ॥ धृ० ॥

पद. ३८

चारुलताः—मज पावन करुनी अक्षयींचा तोष मना दि-
धला ॥ मंगल आशिर्वच या काला ॥ परिसुनि
झाला मोद मनाला ॥ तोष० ॥ धृ० ॥ असुनि वेश्या
नृपतिवनिता झाले आजखरी ॥ संसार सुख झडकरि
अबलेला ॥ मिळो सदोदित सेवावयाला ॥

त्रिविक्रम--संतानीं । आह्मां तें । आनंदें । सौख्याच्या
गिरिवरती नेऊन ठेवियेलें ॥ दुर्दिन ते । विलयातें ।
तुह्मिं नेले ॥ गुरुप्रसाद अह्मांस खचीत हितकर
झाला ॥ शुभकर झाला ॥ सुखकर झाला ॥ धृ० ॥

पद. ३९. ( वायुतनयाला वंदन– या चा० )

बाळ्या } साखरभात जिलबी श्रीखंड खाया ॥ चल फिरे
वामन } बाबा चल झर झर झर ॥ धृ० ॥ एकेक
पुतळी देकार आहे । धोतरजोडा नेसाया घेईन
मी ॥ चल फिरे बाबा ॥ धृ० ॥

पद ४०.

लोटल्या झुंडिच्या झुंडि या ॥ अन्नशाळेकडे जा-
वया ॥ धृ० ॥ चोहींकडोनी ब्राह्मण आले ॥ लगबग
धांवती पात्रें धराया ॥ धृ० ॥ कितिएकांना नसति
सोंवळीं ॥ शतसहस्रात् पंक्ति पुनंति ॥ धृ० ॥

पद. ४१. ( सखया रामा विश्रांती ) या चा०

त्रिविक्रमः–पद्मनयने आनंदें करुं केली ॥ तुजशी बघतां
सुंदरी भ्रांति गेली ॥ धृ० ॥ गजच्छाया पर्वणी आज

आली ॥ सुरत गंगास्नान तूं मजसि घाली ॥ मन्-श्रमाची सांगता योग्य कालीं ॥ करुनि टाकी सुंदरी सुखद वल्ली ॥ धृ० ॥

पद. ४२. ( पिया सोते हररिया ) या चा०

रतिप्रियाः–प्रिया घ्या या मधुरशा शीतलपानासी ॥ करिल हें थंडगार तप्त अशा या हृदया ॥ सुखविल ही वेळ जिवासी ॥ धृ० ॥ प्रियमधुमासीं युवयुवतींची ॥ हरण करी हें मधुपान उदासी ॥ धृ० ॥

पद. ४३. ( अतिशय चढत नग सुता ) या चा०

त्रिविक्रमः–अतिशय कपटि मदनुता ॥ ही ब्रंह्मांडावरति कुटिलामन्मन भेदुनि टाकित आहे ॥ करुं का ठार हिला मी ॥ कोप लेशभर आंवरून धरवेन नीतिभंग करोनी जाळूं काय त्वरित विषलता ॥ धृ० ॥ उभय कुलज नरकांतचि लोटिल रक्तपिती हिला होवोनी ॥ पडूनि किडे ही हाल बहू करुनिया ने भानु सुता ॥ कोपलेश ॥ धृ० ॥

पद ४४. ( प्रपंच अवघा असे ) या चा०

त्रिविक्रमः–स्मरें तुह्मांला मदांध केलें खरें जगींया ॥ मत्प त्नीवर मोहित होउनी ॥ गेलात कैसे सुनीती त्यजोनि॥ दुःख तुह्मांला होईल खचीत ॥ जाऊन पडाल अक्षय नरकांत ॥ कधिं नच वच हें होतील वांया ॥ धृ० ॥

पद. ४५. ( ईशा मजवरि ठेवी दया ) या चा०

मीनकेतनः–ऐशी सुगुणखनी युवती ॥ तुजला न रुचे ॥ नशिबाचा तूं असशी फुटका भूमितला वरती ॥ धृ०॥ हिरा असे ही कांच असशि तूं मूढा पशुपति तूं ज-

गतीं ॥ मधुर सुधेची आवड काय । नीच अशा वायस रसनेला विष्टेनें जी भरली ती ॥ धृ०॥

पद.. ४६. ( पवित्र वेद्दा धुळिस ) या चा०

त्रिविक्रमः—या कुलटेहुनि शुद्ध असे ही वार योषिता कीं जगतीं ॥ सढळ सुकुंकुम तिलक भूषणें असती होइन कधिंच सती ॥ सभ्यपणाच्या डौलावरता सूज्ञ कधिं हा नच फसती ॥ इच्या नखाची कशी साम्यता करील कृष्ण मुखि ही कुमती ॥ धृ० ॥

पद. ४७.( तों तनानानारे तारे ) या चा०

मीनकेतनः-बंदिंत या अधमाला ॥ झडकरी टाकोनी द्या शिक्षा याला । सत्य भोंदु मज गोसावी हा दिसतसे । जनांसि फसवुनी जादूमंत्र करुनी हे ठकविती ॥ माया मोहें अज्ञजन जिंकितात नीच खल ॥ धृ० ॥ कुटिलासी या भयंकर शासन शूलावरति त्वरित चढवुनीया ॥ बंधुस घालुनि मोह स्वराज्य सुख मम सर्वस्वीच लय करोनी उदास जीव करितो तडफड वारांगनें सह बंधू मम रमविला ॥ धृ० ॥

पद्द, ४८. ( शंकरा मजसि सुख दे ) या चा०

उपेंद्रनाथ-
त्रिविक्रम-
साधुचा छळ तूं न करी ॥ सुनीति त्यजुनी नच दे नृपती अजुनि विवेक करी ॥ धृ० ॥ परचक्रदुःखवन्हि कोसळूनि तुजवरी भस्म तव करीलची झडकरी भूमीवरी ॥ नच मानव हा जणुं राक्षस कीं ॥ लेश दया नाहीं मनीं कसाईच खरोखरी ॥ साधूचा या शापज्ञणीं दाखवील यमपुरी ॥ सत्संगतिचा अभिलाष धरी अजुनि विवेक करी ॥ धृ० ॥

( अंक २ रा समाप्त. )

## अंक ३ रा.

पद. ४९ श्लोक ( शिखरिणी )

त्रिविक्रमः-मनोहारीणीचें मुखकमल गेलें सुकुनियां ॥
पहा तन्वी काया विगलित हि झाली श्रमुनियां ॥
प्रिये मीनाक्षी तूं हृदयिं नच शंका धरुनियां
सुखें माझ्या अंकावरति शिर ठेवी रमणि या धृ० ॥

पद. ५०. ( प्रभात समय सुखवी ) या चा०

त्रिविक्रमः-श्रांत सखिस शांति मिळो झोंप येउनी आतां ॥ हास्य वदनिं लाभलिसे अवचित मजसी वनिता ॥ धृ० ॥ विमल जशी शुद्ध कीर्ती ॥ स्व. परि मज दिसत सती ॥ करुण रसाचीच मूर्ति अवतरली चारुलता ॥ धृ० झडकरि आराम देई ॥ ईशवरा या समयीं ॥ प्रिय सखिला सुखासनीं विपुल देइ शांतता ॥ धृ० ॥

पद. ५१. ( वाडामाथी ) या चा०

सर्व सैन्यांतील लोकः—युद्ध करोनीया घनघोर । करु या शत्रूला बेजार । कीर्ती मिळवुनि अपरंपार ॥ उतरुनि टाकूं या भूभार ॥ समशेरी तीर भाले ॥ समरा आतूर झाले ॥ बाहु स्फुरति वारंवार ॥ संगरिं मिळवूं जय जयकार ॥ धृ० ॥

पद. ५२. ( अरे काना बासरी ) या चा०

रतिप्रियाः—वेडया मना कासया करीसि वृथा शोक असा ॥ धृ० ॥ अमृत टाकुनी गरल सेविलेसी ।

विवेकाचा स्नेह तुवां सोडियला ॥ धृ० ॥ सुंदर हंसा विटुनि मदांधा । वायसाला अर्पियला देह कसा । धृ० ।

पद. ५३. ( मोरीन्नया नापकरो ) या चा०

रतिप्रिया:-ईश्वर देत असे सकलांस सत्य ॥ नीच वासने सारिखें फल या जगांत ॥ धृ० चंचल नानस होउनिं माझें मोहपाशीं पडुनीं जनीं ॥ अनुचित करणि करुनि केला कांतघात ॥ धृ० ॥

पद. ५४ ( झेलें शून जावो ) या चा०

मीनकेतन:-गेली । माझी । सौख्य । शांति । खचित कीं लयास ॥ गेलीच । मजसी । सुक्ती । सोडून । अक्षय । जगतीं । यावेळीं ॥ धृ० ॥ मूर्ति तुझी हृदयीं सदोदित ठेविन सुमति जिवा सुख व्हाया ॥ नाम तुझें रमणीय सदोदित घेइन हाच उपाय रमाया ॥ सत्य प्रीति अंतीं देई दुःखाला ॥ याचा अनुभव आहे सर्वांला ॥ प्रियसखि दरशन दे मजला ॥ धृ० ॥

पद. ५५. ( द्रंना द्रंना द्रंना तनदेरना ) या चा०

मीनकेतन:-लेश मात्र सौख्य नाहिं मज जगतीं ॥ स्मरमदें बहुत अंध होवोनी बंधुचित्ता कधीं ही शांती दिलि न या लोकीं धरुनिच कुमती ॥ धृ० ॥ सुंदर बंधूचा कंटाळा करुनी शिक्षा त्यासी अक्षय देउनी मदनपाशिं पडुनी सर्वस्वी राज्य सौख्य अंतरलों ॥ आतां होत दुःखार्णवांत पश्चात् बुद्धि निरर्थकरे । जगतिं दिसत नच कोणी त्राता ॥ जयराम आतां दे विश्राम त्वत्पदिं ही विनति ॥ धृ० ॥

पद. ५६. ( लेश मात्र कां दया ) या चा०

मीनकेतनः–ईश्वरा तुवां मला करुनि शासना ॥ शुद्धिवरति आणिलेंस खचित परिजना ॥ हाय ॥ अंतरीं धरोनिया कुटिल वासना ॥ भोगितों महीवरी असुख यातना ॥ परलोंकीं कधि न मिळे मजसि अतां सुगती ॥ हाल बहू होतिल मम खचित कीं अंतीं ॥ अघोर पातक जाळि मना ॥ धृ० ॥

( अंक ३ रा समाप्त. )

---

## अंक ४ था.

---

५७. सवाई.

भाटः–थोर पराक्रमी वीर उदारधी वीरसेन महाराज महीवरी ॥ सकल प्रजाजन चित्तचकोरचि अवतरला नृपती सुखकारी ॥ थर थर कांपुनि शत्रु रणांगणिं ठेविति लीन शिरें चरणावरी ॥ आचंद्रार्क नरेश यशोध्वज फडकत राहो दे धरणीवरी ॥ धृ ० ॥

पद. ५८. ( हाय हायरे पेट प्यारा ) या चा०

त्रिविक्रमः–नाहीं प्राणाची अशा ॥ ज्याची झाली निराशा ॥ क्षत्रिय कधि ही विनाशा ॥ भीत नाहीं नरेशा ॥ राजनीति भंग जो करील भूपती ॥ अंतीं त्या कधीं

मिळेल काय सद्गती ॥ पूर्व कर्म भोग हे असेंच जाचती ॥ भो ईशा अंतिं नमन तुजसि करितों शांति द्यावया ॥ धृ० ॥

पद. ५९. ( पट्टराणि तुज करुनिं ) या चा०

वीरसेनः--अराजनिष्ठेस्तव दुष्टाला गुलाम करुनि विकुनी टाका ॥ घोर शासना भोगुनि यातें खुशाल मारुंदे हाका ॥ धुंदी याची झडकरि उडुनी जाई तोंवरी द्या शिक्षा ॥ विदेशियाचा आपुल्या देशी उतरुनि टाकावा नक्षा ॥ धृ० ॥

पद. ६० ( सुखोपभोगा ) या चा०

चारुलताः--पदर पसरुनी मागते मी भिक्षा नृपराया ॥ आमुची ताटातूट न करि विनती या समया ॥ परिसुनि दीन अशा अबलेवर कधिं न करी अदया ॥ श्रीजगदीश्वर तुजसि देवो सुमती हे सदया ॥ धृ० ॥

पद. ६१ ( गरलापरि भाषण ) या चा०

त्रिविक्रम.-येईल द्रव प्रस्तरास कधिं तरी जगीं ॥ लेशदया येत नसे अदय नरमनीं ॥ मजसाठीं कां करिसी विनती सुंदरी ॥ शिक्षेची भीति नसे मजसि अंतरीं॥ पूर्व कर्म भोग असे हा खरोखरी ॥ मग कां तूं दुःख करिसि मदनमंजरी ॥ निर्विकार प्रभु चरणां राही वंदुनी ॥ धृ० ॥

पद. ६२. ( धीर न धरवे ) या चा०

चारुलताः-प्राणावांचुनि राहिल कैसा देह नृपा जगतीं या ॥ अनुकंपा करि आह्मांवरती करुणघना नृपरा-

या ॥ भूतदया कां न शिवे अजुनी कोमलशा तव हृदया ॥ भूपतिचें तूं कृत्य न विसरी नीती नया त्यजुनीया ॥ धृ० ॥

पद. ६३. ( पालक हमपर ) या चा०

त्रिविक्रमः–ईश दयेनें सुखमेघाची वृष्टी होउनिया ॥ येईल तुष्टी सत्य आपुल्या दुःखित या हृदया ॥ सदानंद जगदीश्वर जागृत आहे कीं जगिंया ॥ परम न्यायी परम कृपाळू करील गे सदया ॥ काल प्रतीकुल हा सुदती॥ आला ह्मणुनी न करि खंती ॥ जिथें नीतिची पायमल्ली होते वारंवार ॥ तेथें शांती पावे नाश ॥ धृ० ॥

६४ सवाई.

त्रिविक्रमः–धर्म दया नय नीति पराजय होत जिथें बघ त्या स्थलिं अंती ॥ निर्धनता भय शोक अनिर्वच हेच निरंतर वास करीती ॥ भूपतिचें करतव्य खरोखर जो नच जाणतसे नरलोकीं ॥ भूपति तो नच चोर लुटारुचि मानिति अंतरिं सत्य विलोकीं ॥

पद ६५. ( सुहास्य वदनें ) या चा०

वीरसेनः–प्रीति जलाचें अघमर्षण तुज सुमन सुगंधा लावोनी ॥ घालुनि निशिदिनिं अर्पिन तुजला सुतनु सुपुष्पां वाहोनी ॥ विशाल भालीं सुरत सुखाच्या कुंकुंम तिलका लावोनी ॥ गाढालिंगन रत्नालंकृत करीन तुजसी दिनरजनीं ॥ मदनोत्सुक मन्मानसरूपीं धूप सुदीपा लावोनी ॥ अधरामृत नैवेद्य अर्पुनी होइन आनंदी भुवनीं ॥ धृ० ॥

पद ६६. ( नसे भीती मुळीं आतां ) या चा०

चारुलता:-महाराज्ञी करिल कोपा सतत माझ्यावरी नृपते॥
प्रथम याचा करा पुरता विवेक खरा अजुनि सुमते ॥
सवती मात्सर्य सौख्याची करिल होळी खरें कथितें॥
अती दुःखास कारण हें खचित होईल कीं जनितें॥धृ०॥

पद ६७. ( मधुकर जगातिं दुःखार्णविं ) या चा०

वीरसेन:-राज्ञीचें पद मीच तुलागे अर्पण करितों भूमिवरी॥
शंकित हें मन करुनी आतां चिंता अंतरीं तूं न करी॥
व्यर्थ कशास्तव भीति धरुनियां सलज्ज होसी एकांतीं॥
ईश्वर साक्षी ठेवुनि तुजसि वरितों आनंदें जगतीं ॥

चारुलता:-आतुर कां असे होतां तुह्मि नरवीर असुनियां ॥
धैर्य धरा अंतरि या करिते विनती चरणिं या ॥ आधीं
वचन तें पूर्ण करा ॥ आनंदानें मग मज वरा ॥ कांत
विमोचन त्वरें करा ॥ आज्ञा त्यांची द्या मागावया ॥
नाहीं सत्ता देहावरी ॥ धृ० ॥

पद. ६८. ( तेरि मेरी जुरू ) या चा०

वीरसेन:-जरी न परिशिल तूं मम विनती होइन वेडा
प्रिय सुमती ॥ सुरम्य मूर्ति मन्मनीं ठसली शून्य
दिसे जग तुजपुढती ॥

चारुलता:-परनारी अभिलाष अंतरीं ॥ धरुं नये तुह्मिं
जगतिं खरोखरी ॥ विनती होईल मम सुखकारी ॥
मानस न करा मुळि अविचारी ॥ धृ० ॥

१८०४

वीरसेनः-कुसुम शराचा प्रखर मार मज सोसवे न बघ
किमपी सुदती ॥ प्रिय सखे पहासि अंत किती ॥
नच म्हणूं मला गे भ्रष्टमती ॥ धृ० ॥

पद ६९. ( जगदिश हरील ही ) या चा०

चारुलताः—दाखविन चरित्र मी युवतीचें ॥ यथेच्छ पा-
जुनि जलाल मदिरा सत्वर नीचास । बेशुद्ध करुनी ।
जाइन येथोनी । पातिव्रत्य मम रक्षण करुनी ।
स्वकांत दर्शन घेइन मी साचें ॥ धृ० ॥

साकी. ७०.

वीरसेनः-प्रिय मदिरेचा घुटका लावो मजसि सखीचा
चुटका ॥ सुप्रेमाचा फटका लागुनी होउं युगाची
घटिका ॥ लटका मदन पडो ॥ सौख्यानंदी त्व-
रित बुडो ॥ धृ० ॥

साकी ७१.

वीरसेनः-तुझ्या नरडिचा घोंट घेउनी शमविन हृद्रोगाला॥
नाक कांपुनी घेतलेंस तूं माझें या समयाला ॥
नससी तूं युवती ॥ असमी राक्षसीण जगतीं ॥ धृ० ॥

पद. ७२ ( ठाउक मजला ) या चा०

त्रिविक्रमः-खऱ्या सुवर्णा ताव दिल्याविण तेज कधींही
चढत नसे ॥ साणेवरती धरिल्या नंतर हीरक सहजी
खुलत असे ॥ संकटकालीं नच डगमगतां जो
नर शांती धरितअसे ॥ धन्य तोचि नर भूमितलावरि
पुण्य गिरीवर चढत असे ॥ दुःखार्णावें या गेल्या-

वांचुनी सौख्य रत्न तें मिळत नसे ॥ सत्याचरणा सम भूषण जनीं अन्य कोणतें मज न दिसे ॥ धृ० ॥

पद ७३ ( कुटिला नार किती ) या चा०

त्रिविक्रमः–मित्र हा कोण असे काय ह्मणुनी सोडवितो ॥ जिवलग ह्मणवितसे परि न मी ओळखितों ॥ सदया तुज दासपणा जाच बहू देइल तो ॥ आलास तसा जा परतुनि तुजसि सांगतों ॥ धृ० ॥

पद ७४ ( सत्कीर्तीचा उदयचि झाला )

त्रिविक्रमः–मित्रत्वाचा कळसचि झाला या समयीं जगतीं ॥ जे निजकर्तव्या ओळखिती ॥ ते जन्मुनि धन्य पहा होती ॥ उपकृति तव ही फेडायास्तव देह झिजविला तरी बघ होईल कीं कमती ॥ तुजकरितं मी वेंचिन प्राणा ॥ मित्रत्वाचा राखुनि बाणा ॥ संशय डोहीं बुडवीन मना ॥

शूरसेनः–श्री जगदीश उमेश कृपाकर संकट वारिल तव सुमती ॥ जनन मरण करुनि हरण देईल सद्गती ॥

अंक ४ था समाप्त.

## अंक ५ वा.

७५. श्लोक. ( शार्दूलविक्रीडित )

वीरसेनः—अंगाची लाहि होई ह्मणुनि मजसि ही शांति सोडून जाते ॥ दुष्टाची गर्व उक्ती मृदुतर हृदया भेदुनी पार होते ॥ राजद्रोही खलाचें अशुभ वदन हे पाहुनी खंति येते ॥ दुष्टाचा घात आतां झडकरिं करुं कां या क्षणीं शस्त्रघातें ॥

पद. ७६ ( मानत नाहीं मज ) या चा०

मोहिनीः-वाटत नाहीं मज चैन कसें तें ॥ प्रियकर अंतरीं रमत असे गे ॥ धृ० ॥ मानस त्यांनीं हिरुनी नेलें ॥ ह्मणुनिच वेडी झालें मी दिनरजनीं ॥ धृ० ॥

पद. ७७. ( पैसा असे हा ) या चा०

मोहिनीः-अनंगा मनांत दंगा करुनि वारंवार ॥ कुसुमशरा अनिवार ॥ तुझा भडिमार । करी बेजार ॥ धृ० सुरत गंगा । सुखतरंगा अंतरंगा । घे अभंगा ॥ मोहिनी अनुभवी ॥ विषय सुखानंद अपरंपार ॥ जगदीशा तुजवर सर्वस्वीच भार ॥ धृ० ॥

पद. ७८. ( दिलदारी ) या चा०

मोहिनीः—मन माझें चोरिलें तुह्मीं कां कांता ॥ दिनरजनीं मज मारुनिया स्मरशर मजवरी सोडुनि अतिशय मानस वेधियलें ॥ धृ० ॥ कुसुमचाप हा सकल जगाला ॥ पाश घालुनि अजिंक्य झाला ॥ पंच-

प्राणा । नाथा आतां चरणीं वाहिलें ॥ त्वच्चरणीं वाहिलें ॥ धृ० ॥

पद ७९. ( दिडदादिडदाडा ) या चा०

शूरसेनः—चित्त असें कां भ्रांतचि झालें अविचाराचा मार्ग तूं न धरी ॥ मदनाचा या पगडा बसवुनि घेउं नकोगे हृत्पटलावरी ॥ सूज्ञ असुनि तूं अज्ञ होसि कां नकळे मजला कैसे तिळभरी ॥ चतुर असुनि तूं आतुर कैसी होतिस सुमति गे वरचेवरी ॥ सुकुमारी तूं असिसि कुमारी मानस उच्छृंखल हें नकरी ॥धृ

पद. ८० ( भलाहुवा मै ) या चा०

मोहिनीः—तव स्वरूपीं रत मन झालें सांगुं किती सुमती ॥ विरिंचिहरिहर तूं मन मोहन दिससी मला जगतीं ॥ जिवा शिवाचें ऐक्य करोनी ॥ चिरसुख शांतिस घेऊंदे मनीं । असुखार्णव हा तरुनी जाया नौका आपण भूवरता ॥ धृ० ॥

पद ८१

शूरसेनः—मदनें व्यथित अशी होउं नको सुदति अंतरीं ॥ मी गुलाम तालिवार तूं महीवरी ॥ वरुनि चतुर नरा होइ त्याची सतत किंकरी ॥ देहभान नच विसरुनि जाइ सुंदरी ॥ धृ० ॥

पद. ८२. ( सननन सोहे ) या चा०

मोहिनीः-अघटित असेही विधिघटना अनायासें चालुन आला तुह्मीं मम सदना ॥ धृ० ॥

शूरसेनः-दासत्व करुनिया उदर मी भरितों ॥ वरुनि तुला मी करुं तरि काय ॥

मोहिनीः- वय स्वरूपा योग्य वर आपणची चिर सुख शांती स द्या सुमना ॥ अव्हेर करा न मन मोहना ॥ धृ० ॥

पद. ८३. ( हिरिया मेरा नाम ) या चा०

मोहिनीः-मन्मनोहरा ॥ शंकित होउं नको हृदयीं ॥ दासत्व हें तव करिन मी पार ॥ तुज स्वतंत्रता सुख देइन अपार ॥ सेवूं रतो सुखासो अपरंपार ॥ तव पदीं देइ ठाव । माझा तुजवर भाव ॥ मन करुनि उदार ॥ शिरीं घेई मम भार धृ० ॥

पद. ८४. ( चला जिवाची ) या चा०

शूरसेन-जिवलग मित्राहूनी नाहीं प्रीती प्रियकर मज जगतीं ॥ हट्ट तुझा हा अप्रिय भासे मरणाहुनी कीं सुदती ।

मोहिनीः-प्रीतिबंधनें जखडुनी मना ॥ त्यजुन जातसा मदन मोहना ॥ करिन सत्य मी हृदय रंजना नृपतिच्या पहा कोपसांत्वना ॥ प्राण धना ॥ अर्पुनियां ॥ प्राणाची मज नाहीं पर्वा आपुल्या पुढती भूवरती ॥ सत्प्रीतीचा कळस पाहुनी नवल करितिल युव युवती ॥ धृ० ॥

पद. ८५. ( गेली माझी सुख ) या चा०

पद्मनाभः-आशा भंग झाला माझा खचित भूवरी ॥भक्ताच्या प्राणाची आहूती काळाला आतां मी देउं कशी॥ निष्ठुरतेस कसातरि देऊं आश्रय अंतरीं सांप्रत काळीं ॥ भक्त त्रिविक्रम ईश दयेनें होवो या क्षणिं वैभव शाली ॥ माझी आशा पूर्ण करी भो मदनारी॥ तुजविण जगीं नच अन्य सहकारी ॥ आनंदाची वृष्टी करी आणि सुखकारी ॥ धृ० ॥

पद. ८६. ( दृष्टीस पडल्या पासुनी ) या चा०

त्रिविक्रमः-जीवन माझें व्यर्थ जहालें ॥ या भूवरती कांहिं न केलें ॥ लोकहितास्तव सांप्रतकाळीं ॥ पडला नाहीं देहाचा बळी ॥ परि दुर्दैवें कांहिं न घडलें ॥ शुष्क कारणास्तव यमसदनां ॥ जातों आशा निष्फळ होउनी ॥ जननी उदरा व्यर्थ शिणविलें ॥ धृ० ॥

पद. ८७. ( हा सकल देह ) या चा०

त्रिविक्रमः-सद्गति मनुजास मिळे सकल भोग संपल्यावरी॥ कर्माचि परिसमाप्ति जाहली खरी ॥ धृ० ॥ वाटतसे मरण मला सुखद अंतरीं ॥ आनंदें जाइन मी खचित सुरपुरीं ॥ कर्म भोग कधिंन टळे दुःख करुनि अंतरीं ॥ सखये चारुलते सौख्य तुला कधिंन दिलें मी महीवरी ॥ धृ० ॥

पद. ८८.

त्रिविक्रमः-येये झडकरि धांवुनि सुंदरि अंती दर्शनसुख मज देई ॥ राजद्रोहाग्नीला पडतो मद्देहाचा बलि या समयीं ॥ निरपराधी क्षत्रिय वीरा कृतांत नेण्यास्तव करि घाई ॥ मरण मला समरांगणिं रमणिय झालें असतें कीं सुखदायी ॥ धृ० ॥

पद. ८९ ( विश्वंभरहरा ) या चा०

उपेंद्रनाथ, चारुलता, मोहिनी — भक्तावरी शस्त्र धरू कैसें तरी ॥ मज दे चरणीं जगदोद्धरणा ठाव । पाव । दे । सहाय अपराधी भूमीवरी ॥ मीच आहे खरोखरी ॥ दयाकरी साधूवरी ॥ सोडूनी दे झडकरी ॥ हत्या घेऊं नको शिरीं ॥ भूपा कोप तूं आंवरी ॥ विनती ऐका क्षणभरी ॥ मजसी धाडा यमपुरीं ॥ थांबा

थांबा जरा आतां ॥ शांती दया चित्तीं धरी ॥ अन्यायानें भूमिवरि ॥ अनर्थ होतिल कीं अनिवार धांव गौरिकांत ॥ धृ० ॥

पद. ९० ( झाला उदय मनोदय ) या चा०

मोहिनी:—माया मोहानें जखडिलें ॥ ह्मणुनी लज्जेनें सोडियलें ॥ प्रिय जीवन संगतिनें पितया धांवत कीं आलें ॥ प्रिय सुतेवरि दया करावी मन हे बावरलें ॥ जिवलग संकटिं बुडुनी गेलें ॥ मीतरी प्राणा त्या अर्पियलें ॥ वीरसेन नृप कोप सांत्वना करण्यास्तव आलें ॥ नरशिरोमणे दया करुनियां गुलामावरी घ्यावें ह्मणुनि भलें ॥ धृ० ॥

पद. ९१

सर्वजण:--मोदवृष्टि तुष्टि देइ सकल सुजन अंतरीं ॥ सतू गुरुपद कमल अखिल दुरित संहरी ॥ रावरंक सम समान दिसति जयास भूवरी ॥ भिन्नभाव त्यास कधिंहि स्पर्श करि न तिळभरी ॥ सद्‌गुरू चिंतन अक्षय आनंद सकालांसी देई भूमिवरी ॥ धृ० ॥

पद. ९२ ( पृथ्वीछंद )

असो सुख समृद्धिचा सतत वास या भूवरी ॥ प्रजाहित करावया नृपति दक्ष हो अंतरीं ॥ करोनि जनिं ऐक्यता समुळ मत्सरा संहरी ॥ विधीहरहरि कृपा विपुल होउ सर्वांवरी ॥

अंक ५ वा समाप्त.

संग्रहालय

## ईश्वरस्तुति.

### ९३. भरत वाक्य ( भैरवी )

शंकरा | सुरवरा | शिवहरा | ईश्वरा । भवनिधिं-तुनी पार करुनी चरणकमलिं मजसि देइ सतत आसरा ॥ धृ० ॥ षडरि दमन | करुनि भवन | दाखवि तव कमलवदन ॥ जनन मरण करुनि हरण सन्निध सहवास सौख्य देइ पार्वती वरा॥धृ०॥ भारतियां वरति रोष | कधिं न करुनि देइ तोष ॥ विधिहरिहर नाम घोष | निरसुनियां सकल दोष दोनदास | माधवास | शांति देई भवहरा ॥ धृ० ॥

**समाप्त.**

REFBK-0019485
REFBK-0019485
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०८५

# विक्रीस तयार.

## पाटणकरकृत संगीत व इतर पुस्तकांची यादी.

| | | किंमत. रु. आ. पै. |
|---|---|---|
| संगीत विक्रमशशिकला | .. .. | ०-१२-० |
| संगीत सत्यविजय | .. .. | १--०--० |
| संगीत सीमंतिनी | .. .. | ०-१०-० |
| संगीत युवतिविजय | .. .. | ०-१२-० |
| संगीत वसंतचंद्रिका | .. .. | ०-१२-० |
| संगीत राजविजय ( पद्यावली ) | .. | ०--३--० |
| संगीत समाजसंजीवनी ,, | .. .. | ०-२--० |
| संगीत वत्सला ,, | .. .. | ०--२--० |
| अधिकारमदविपाक नाटक | .. .. | ०-१२-० |
| अनाथ जनावरांचे संगोपनाचा सोपा व सोइस्कर उपाय. निबंध. | .. .. | ०--१--० |

हीं सर्व पुस्तकें काळकादेवी रस्त्यावर मेसर्स सखाराम माधव टिळक आणि कंपनी, वॉचमेकर यांचे दुकानीं व वुद्द मालकाकडे ( पाटणकर संगीत मंडळींत ) विकत मिळतील. घाऊक घेणारांस कमिशन चांगलें मिळेल.

पुस्तककर्ता.